पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २७**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ६/१०/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ५६३**

मा.प्रिया गदादे व मा.सौ.वैशाली बनकर यांचे दि.२२/९/२०२० चे पत्र.

पुणे मनपा घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कचरा प्रकल्पचालक ठेकेदार मे.भूमी ग्रीन एनर्जी, मे.आदर्श कन्स्ट्रक्शन व अन्य ठेकेदार चालवित असलेले कचरा प्रक्रिया प्रकल्प वादाच्या भोवऱ्यात सापडलेले आहेत. सदर सर्व कचरा प्रकल्पाची कार्यक्षमता व दर यांचे ऑडीट त्रयस्थ शासकीय संस्थेमार्फत करण्यात यावे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचा संपुर्ण कार्यभार आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्याकडे पुर्णवेळ सोपविण्यात यावा.

**विषय क्र. ५६४**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि.२५/९/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिका टेंडर मधील अटी व शर्ती सर्व विकाससाठी एक सुत्रता असावी यासाठी मा.महापालिका आयुक्त यांनी लक्ष देवून अटी शर्ती निश्चित करावी.

**विषय क्र. ५६५**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि.२५/९/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिका सर्व कामांची बिलांची मोजमापे सॉफ्टवेअर द्वारे बिल तपासणीची कामे ऑनलाईन पध्दतीने मा.महापालिका आयुक्त यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ५६६**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील सन २०१९-२०२० मधील पेठ शिवाजीनगर अे फॉर्म क्र. ६१ या मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/९१२ दि.२८/९/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १३ सन २०२०-२०२१ चा विचारासाठी.

**सर्वात कमी रकमेचे टेंडर्स**

**विषय क्र. ५६७**

शिवाजीनगर घोले रोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत यंत्राच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन व चेंबरची साफसफाई करणे व गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नटराज कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५३,२३,५७२/- पेक्षा १०.१२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४७,८४,८२६=५१ पर्यंत होणा-या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/मलनि:/३०६ दि.२८/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५६८**

पुणे शहरातील सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत डांबर व कॉंक्रिट रस्त्याचे रोड मेंटनस व्हॅनद्वारे वार्षीक देखभाल दुरुस्ती विषयक कामे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदर्श कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,१४,९७३/- पेक्षा ११.१५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७९,२०,९५३=५१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये१०,६९,७९६=७६ पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३१० दि. २९/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५६९**

पुणे शहरातील औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत डांबरी व कॉंक्रीट रस्त्याचे रोड मेंटेनन्स व्हॅनद्वारे वार्षीक देखभाल दुरुस्ती विषयक कामे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जय शिवशंकर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,१४,९७३=६० पेक्षा २७.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६४,९१,८८३=३४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६९,७९६=७६ पर्यंत अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३११ दि. २९/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५७०**

पुणे शहरातील कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत डांबर व कॉंक्रिट रस्त्याचे रोड मेन्टेनस व्हॅनद्वारे वार्षीक देखभाल दुरुस्ती विषयक कामे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.विठ्ठल एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,१४,९७३/- पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८८,२५,८२३=२७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६९,७९६=७६ पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३१२ दि. २९/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५७१**

कोंढवा बु. येवलेवाडी व कात्रज परिसरात एम.एन.जी.एल./महावितरण यांचे मार्फत खोदाई झालेल्या रस्त्यांच्या पृष्ठभाग रिईन्स्टेटमेंट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदर्श कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,३२,१७७/- पेक्षा २५.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६५,७५,५५५=७८ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये१०,५९,८६१=२४ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ९५,४०४=५० अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये १२,३९०/- पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३१३ दि.२९/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५७२**

आंबेगाव येथील कचरा प्रक्रीया प्रकल्पाकरीता ट्रान्सफॉर्मर बसविणे चालु करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.व्ही.एस.इंजिनिअरिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.६५,१५,६१३/- पेक्षा १८.८९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५२,८४,८१३=७० अधिक जी.एस.टी. १२% र.रुपये ६,३४,१७७=६४ असे एकूण र.रुपये ५९,१८,९९१=३४ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/३१४ दि.२९/९/२०२० चे पत्र.

**संकीर्ण**

**विषय क्र. ५७३**

टेंडर क्र. ६३/२०१९ नुसार भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली मारुती इको या संवर्गातील वाहने घेणेकामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/३०४ दि.२८/९/२०२० चे पत्र.

१) मा. स्थायी समिती ठराव क्र. ११८० दि. १३/०९/२०१९ प्रमाणे मे.चिन्नू ट्रॅव्हर्ल्स, पुणे यांचेकडून मान्य टेंडर दराने (९% जादा) दि. ०१/०६/२०२० ते दि. ३१/०७/२०२० पर्यतच्या कालावधीसाठी रक्कम रुपये ५२,२७,१७१=२३ पर्यत (अक्षरी रक्कम रुपये बावण्ण लाख सत्तावीस हजार एकशे एक्काहत्तर पैंसे तेवीस फक्त) पर्यंत वाहन पुरवठा करुन घेणेस

**विषय क्र. ५७४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपाच्या हद्दीत कोरोना (कोविड-१९) या विषाणुच्या संसर्गामुळे मृत पावलेल्या व्यक्तींवर अत्यावश्यक असलेल्या सेवकांकडून, मनपाचे निश्चित केलेल्या विद्युत/गॅस दाहिन्यांमध्ये अंत्यसंस्कार करण्याचे कामे मे.एस.ए.एन्टरप्रायझेस यांचेकडून र.रुपये१२,९८०/- प्रतिमहा प्रतिसेवक या दराने दि.९/३/२०२० ते दि.३१/७/२०२० पर्यंत कामे करण्यास व त्यापोटी र.रु. ८,८७,८३२/- पर्यंत बिल अदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विद्युत/३०५ दि.२८/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५७५**

पुणे पेठ बिबवेवाडी मुख्य रस्ता ते बिबवेवाडी स्मशानभूमि पर्यत बिबवेवाडी स.नं.६३४, ६३५, ६२४, ६३७ व ६३८ येथील ९.०० मी.रुंदीच्या प्रमाण रेषेत बदल करुन मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २१०(१)(ब) अन्वये मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबतच्या नकाशात हिरव्या रंगाने दर्शविल्यानुसार १२.०० मी. रुंदीची रस्ताप्रमाणरेषा कायम करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/३०८ दि. २९/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५७६**

टेंडर क्र. १६४/२०१९-२० नुसार भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली वाहने घेणेकामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/३०९ दि. २९/९/२०२० चे पत्र.

१) मे. जे. के. टुरिस्ट ॲण्ड ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (२% जादा) निविदा रक्कमेच्या वाढीव ५०% पर्यत म्हणजेच कोविड - १९ उपाययोजने अंतर्गत तातडीची बाब म्हणून भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली रक्कम रु. ५०,६८,६१०/- पर्यत घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस--

२) प्रकरणी मनपाचे प्रशासकीय कामी तसेच कोविड - १९ चे प्रशासकीय व वैंद्यकीय कामकाज करणेसाठी या निविदामधून निविदा रक्कम संपलेपासून ते दि. ३१/०८/२०२० अखेर कालावधीमध्ये कामाची मान्यता मिळणेस व त्यापोटी देयके आदा करणेस----

प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.